
दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • गुरुवार दि.१९ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १७५ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Thrusday 19 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 175 • Pages 4 • Rate 4 Rs




# अजित पवारांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशीची मागणी,सुनील तटकरेंनी दिली माहिती

## सुनेत्रा पवारांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आणि त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. त्यातून सावरत आता उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी हाती घेतली आहेत. इतर सर्व सुरळीत सुरू झाले असले तरी अजित पवारांचा अपघात होता की घातपात यावर अद्यापही शंका उपस्थित केल्या जात आहेत. त्यातच सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या इतर नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. याबद्दल पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माहिती दिली आहे.अजितदादांच्या विमान अपघाताची चौकशी सीबीआयमार्फत केली जावई, अशी मागणी करण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली.**




दैनिक वादळ वार्ता । मुंबई । प्रतिनिधी

प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले, मी स्वतः त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ मंत्री हसन मुश्रीफ आणि पार्थ पवार अशा सर्वांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अजितदादांच्या अपघाती मृत्यू झाला त्याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांना एक निवेदन दिले आहे. या पूर्ण प्रकरणाची सीबीआयच्या माध्यमातून चौकशी करावी, यशही मागणी आम्ही केलेली आहे. तसे निवेदन आम्ही दिलेले असल्याची माहिती तटकरे यांनी दिली आहे.पुढे बोलताना सुनील तटकरे म्हणाले, निवेदनाची दखल घेत राज्य सरकार उद्या केंद्र सरकारकडे अजितदादांच्या अपघाती मृत्यूची चौकशी करण्याची मागणी करणार आहे. तसा पत्रव्यवहार केला जाईल. मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडून तशी पावले उचलली जातील, असेही तटकरे यांनी यावेळी सांगितले आहे. त्यामुळे आता हे प्रकरण सीबीआयकडे गेले तर कोणती नवी माहिती समोर येते याकडे लक्ष असणार आहे.

# नंदुरबार: राष्ट्रीय महामार्ग ७५२-जी आणि गोमाई पुलाच्या कामांना मिळणार गती

## उपजिल्हाधिकारी कृष्णकांत कनवरियांकडून प्रत्यक्ष पाहणी

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी



राष्ट्रीय महामार्ग ७५२-जी आणि गोमाई पुलाचे काम वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावे, यासाठी प्रशासन आता अधिक सक्रिय झाले आहे. दि. १६ फेब्रुवारी रोजी उपजिल्हाधिकारी कृष्णकांत कनवरिया यांनी या प्रकल्पांतर्गत भूसंपादन झालेल्या क्षेत्राची आणि पुलाच्या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली.मौजे चांदसैली येथील गट क्र. ९७ मधील भूसंपादन झालेल्या क्षेत्राची पाहणी करताना कनवरिया यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत सविस्तर चर्चा केली. यामध्ये जमिनीचा प्रत्यक्ष ताबा, प्रलंबित तांत्रिक बाबी आणि पुढील कायदेशीर कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. महामार्गाचे काम कोणत्याही अडथळ्याविना पार पडावे, यासाठी त्यांनी प्रशासकीय यंत्रणेला आवश्यक सूचना दिल्या.

पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांनी सागर पोल्ट्रीफार्म येथे भेट दिली. प्रकल्पग्रस्त क्षेत्राची सद्यस्थिती जाणून घेतानाच त्यांनी प्रकल्पग्रस्तांशी संबंधित मुद्द्यांची माहिती घेतली. विकासाच्या कामात स्थानिकांच्या समस्यांचे निराकरण करण्याकडे प्रशासनाचा सकारात्मक दृष्टिकोन असल्याचे यावेळी दिसून आले.यानंतर, कनवरिया यांनी गोमाई पुलाच्या सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. पुलाच्या बांधकामात सुरक्षिततेचे नियम पाळले जात आहेत का आणि कामाचा दर्जा कसा आहे, याची त्यांनी बारकाईने तपासणी केली. पुलाचे काम हे तांत्रिकदृष्ट्या सक्षम असावे आणि नागरिकांना सुरक्षित वाहतूक उपलब्ध व्हावी, असे निर्देश त्यांनी संबंधित कंत्राटदार आणि यंत्रणेला दिले.

# आष्टीत ‘उमेद’ अंतर्गत कर्ज मंजुरी व वितरणाचा भव्य मेळावा

## खा.बजरंग सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील स्वयं सहाय्यता समूहांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी ‘उमेद’ अर्थात दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान अंतर्गत बँक कर्ज मंजुरी पत्र व कर्ज वितरणाचा भव्य मेळावा गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.



ग्रामीण भागातील महिला बचत गटांना स्वावलंबी बनविणे, लघुउद्योगांना चालना देणे व आर्थिक बळकटी प्रदान करणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. विविध राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या कर्जांचे प्रत्यक्ष वितरण या मेळाव्यात करण्यात येणार असून पात्र स्वयं सहाय्यता समूहांना कर्ज मंजुरी पत्रे प्रदान करण्यात येतील.

मेळाव्याचे आयोजन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, बीड, पंचायत समिती आष्टी तसेच संबंधित बँकांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.दरम्यान, कार्यक्रमाच्या निमित्ताने नागरिकांना व स्वयं सहाय्यता समूहांच्या सदस्यांना आपल्या तक्रारी व अडचणी थेट अधिकाऱ्यांसमोर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संबंधित लाभार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.‘उमेद’ अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महिलांच्या हाताला काम व उद्योगाला चालना देत आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक सक्षम करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असून, या कर्ज वितरण मेळाव्यामुळे आष्टी तालुक्यातील अनेक कुटुंबांना आर्थिक बळकटी मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नवापूर तालुक्यात निति आयोगाच्या आकांक्षी तालुका कार्यक्रमांतर्गत ‘संपूर्णता अभियान २.०’ शुभारंभ



दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

दि. १७फेब्रुवारी २०२६ रोजी नवापूर तालुक्यात निती आयोगाच्या आकांक्षी तालुका कार्यक्रम (aspirational Block Programme) अंतर्गत ‘संपूर्णता अभियान २.०’ चा औपचारिक शुभारंभ मा. गटविकास अधिकारी देविदास देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या कार्यक्रमास निती फेलो क्षितिजा देशमुख तसेच सर्व विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी, पर्यवेक्षक तसेच अंगणवाडी सेविका, आशा, एएनएम, शिक्षक व विविध विभागांचे क्षेत्रीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी अभियानाची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली. आरोग्य, पोषण, शिक्षण, शेती, मूलभूत सुविधा व उपजीविका या प्रमुख क्षेत्रांतील विकास निर्देशांकांमध्ये लक्षित सुधारणा करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. निर्देशांकांचे सॅच्युरेशन, रिअल-टाईम डेटा मॉनिटरिंग आणि पुराव्यावर आधारित नियोजनाद्वारे ठोस व वेळबद्ध परिणाम साध्य करण्यावर विशेष भर देण्यात आला.मा. गटविकास अधिकारी यांनी विभागांमधील समन्वय, जबाबदारी निश्चिती आणि नियमित आढावा यंत्रणा मजबूत करण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या. अधिकृत पोर्टलवर वेळेवर अहवाल सादर करणे, क्षेत्रीय पडताळणी करणे आणि शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचविणे यावर विशेष भर देण्यात आला.क्षेत्रीय कर्मचारी हे शासन योजनांचे प्रत्यक्ष वाहक असल्याने त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे नमूद करण्यात आले. सर्व विभागांनी एकत्रित व पारदर्शक पद्धतीने कार्य करण्याचा, समुदाय सहभाग वाढविण्याचा आणि स्थानिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाययोजना राबविण्याचा सामूहिक संकल्प केला.‘संपूर्णता अभियान २.०’ अंतर्गत नवापूर तालुक्याचा सर्वांगीण व शाश्वत विकास साधण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. हा कार्यक्रम नवापूर तालुक्याच्या विकासाच्या नव्या टप्प्याची प्रभावी सुरुवात ठरणार आहे.

# माजलगाव येथे बौद्ध धम्मप्रचारकांचा जिल्हास्तरीय गौरव सोहळा

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । प्रतिनिधी

जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व सातकर्णी युवक संघ, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने धम्मप्रचारक, बौद्धाचार्य व समता सैनिकांचा जिल्हास्तरीय गौरव सोहळा रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. श्रावस्ती बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प, माजलगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला सद्धम्माचा आदर्श घराघरात आणि मनामनात पोहोचवण्यासाठी अविरत कार्य करणाऱ्या आंबेडकरी धम्म योद्ध्यांचा यावेळी यथोचित सन्मान करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील सक्रिय बौद्ध विहार, धम्मप्रचारक, बौद्धाचार्य तसेच समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचा जाहीर सत्कार या कार्यक्रमात होणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख मार्गदर्शक म्हणून आयु. भास्करराव भोजने (अध्यक्ष, विद्वत सभा, महाराष्ट्र राज्य, अकोला) उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख वक्ते म्हणून प्रा. श्रीकिशन मोरे (सहयोगी प्राध्यापक, माणिकचंद पहाडे




विधी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. प्रदीप भोगले साहेब (सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग, बीड) यांच्या हस्ते होणार असून स्वागताध्यक्ष म्हणून मा. भारत तांगडे (संस्थापक, जनकल्याण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड) कार्यभार सांभाळणार आहेत.या गौरव सोहळ्यास बीड जिल्ह्यातील बौद्ध बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सातकर्णी युवक संघाचे आयु. रविकांत उघडे, आयु. बाबासाहेब जाधव, आयु. अशोक कांबळे, आयु. संपादक सुहास बोराडे, आयु. लक्ष्मण जाधव व आयु. इंजी. बिभीषण उघडे यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद शाळा हरीलाल नाईक तांडाच्या व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी छगन राठोड

दैनिक वादळ वार्ता
गेवराई । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हरिलाल नाईक तांडा गेवराई या शाळेच्या व्यवस्थापन समितीचे गठन करण्यात आले असून, अध्यक्षपदी छगन मोतीराम राठोड तर सचिवपदी मुख्याध्यापक भडके सर, उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वांमध्ये बिनविरोध निवड करण्यात आली आहे. गेवराई तालुक्यातील हरीलाल नाईक तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी गठन करण्यात आले आहे. या समितीच्या अध्यक्षपदी छगन मोतीराम



राठोड, सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापक फडके सर तर उपाध्यक्षपदी नवनाथ दिना चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या पुढील काळात शाळा सुंदर व सुसज्ज करण्यासोबतच येथील विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्ष छगन राठोड आणि उपाध्यक्ष नवनाथ चव्हाण यांनी सांगितले. याप्रसंगी कैलास राठोड, रघुनाथ राठोड, जीवन राठोड, ज्ञानेश्वर राठोड, रमेश राठोड, विकास राठोड, ग्रामपंचायत सदस्य दत्ता राठोड, संतोष चव्हाण यांच्यासह शाळेतील पवार सर, काळे सर, सपाटे सर, घोडके सर, कुलगुडे सर, श्रीमती देवडे मॅडम, श्रीमती नदाडे मॅडम, अंगणवाडी सेविका संगीता राठोड, मीरा चव्हाण, मीरा विजय राठोड यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिलावर्ग बहुसंख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

## एआय सर्वांसाठी

सन २०२५-२६ पासून भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत केले. केंद्रीय चौकट जी २०२५ मध्येच निश्चित करण्यात आली होती. तिला आता व्यापक स्वरूप देण्यात आले. दिल्लीच्या भारत मंडपम येथे परिषद भरत आहे. एआय तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञान म्हणून न करता तिचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी आणि विकास करण्याचा उद्देश आहे.सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली.लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनूकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारतात भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्व्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्तियानो एमोन आदींचा समावेश आहे.नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आहे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील. यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे. या मार्गदर्शक तत्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पाहत आहे.एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे. रोजगार, भाषा, नवीन रोजगार मिळवणे, सार्वजनिक सेवा आणि सामान्य लोकांना लाभप्रद होतील अशा योजना राबवणे यासाठी एआयचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने या परिषदेत विचार केला जात आहे. ब्रिटनचे उपपंतप्रधान डेव्हीड लॅमी आणि एआय मंत्री कनिष्क नारायण हे भारतात आलेल्या शिष्ट मंडळात आहेत. त्यांनी सांगितले, की एआयचा उपयोग करून रोजच्या जीवनात कसा सामान्याना लाभ करून देता येईल आणि जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एआयचा उपयोग करून डॉक्टर त्वरीत रोगनिदान करतील, शिक्षक शिकवण्यात नवनवीन पद्धती आणतील आणि परिषदा सेवा झटपट देऊन उद्योग नवीन जनरेशनचे रोजगार तयार करतील हे पहाण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआय हे अभूतपूर्व वचन देते की जागतिक आव्हानांना जसे की सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण आणि शेतीत उत्पादकता वाढवणे आणि त्यासोबतच मानवी हक्कांचा आदर करणे याबाबत क्रांतिकारी आहे. एआय पद्धतींचा वापर जर उपयोगकर्ते आणि विकासक यांच्यामार्फत झाला तर समाजाला त्याचा शेवटी प्रचंड लाभ होऊ शकतो. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असूनही भारतात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि डिजिटल बाजारपेठांपैकी ती सर्वात वेगाने वाढणारी आहे. मानवता, समावेशक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एआयचा उपयोग केला पाहिजे असे जे भारताचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले ते अगदीच योग्य आहे. ही शिखर परिषद राष्ट्रीय क्षमता, आर्थिक लवचिकता आणि दीर्घकालीन क्षमतांचा सक्षम देश म्हणून भारताची ओळख निश्चित करेल. अत्यंत झपाट्याने बदलत असलेल्या एआयचे जग समजण्यासाठी आणि एआयचा उद्देश्य सामान्य जनांपर्यंत पोहोचवणे हा या परिषदेचा हेतू आहे. भारत भरवत असलेल्या या परिषदेची संकल्पना आहे. सर्वजन हिताय सर्वजन सुखाय. हा हेतू सर्व काही सांगून जाणारा आहे. यावेळी परिषदेचा हेतू एआयपासून धोका हा केवळ नाही तर एआयपासून सामान्य लोकांना होणारा फायदा हाही आहे.

# शेतकरी,बेरोजगार,महिला,कायदा सुव्यवस्थेच्या प्रश्नावर काँग्रेस रस्त्यावर उतरुन सरकारला जाब विचारणार: रमेश चेन्नीथला

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाकडून लोकशाहीची हत्या, विपरित परिस्थितीत काँग्रेस कार्यकर्ते निर्धाराने लढले

### काँग्रेसच्या पॉलिटिकल अफेयर्स कमिटीच्या बैठकीत राजकीय, सामाजिक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

काँग्रेस पक्ष राज्यात आगामी वर्ष संघटन बांधणीवर भर देत गावपातळीपर्यंत नियुक्त्या करण्याबरोबर सेल, विभाग, सेवादलही मजबूत करणार आहे. केंद्र व राज्यातील भाजपा सरकार विकासाच्या नावावर केवळ राजकारण करत असून शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर आहेत, आमहत्या वाढल्या आहेत. बेरोजगारी वाढली आहे, महिला अत्याचाराचे प्रमाण वाढले असून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. जनतेचे हे प्रश्न हाती घेऊन काँग्रेस पक्ष विविध आंदोलने व मोर्चांच्या माध्यमातून सरकारला जाब विचारेल, असे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला म्हणाले..महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत व प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली प्रदेश काँग्रेसच्या पॉलिटिकल अफेयर्स कमिटीची बैठक टिळक भवन मध्ये पार पडली. या बैठकीला विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज उर्फ बंटी पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ नेते काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, विधानसभेचे माजी अध्यक्ष नाना पटोले, वर्किंग कमिटाचे सदस्य नसीम खान, गोव्याचे



प्रभारी माणिकराव ठाकरे, खासदार चंद्रकांत हांडोरे, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, अमित देशमुख, शिवाजीराव मोघे, आ. अस्लम शेख, आ. अमीन पटेल, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, रेहाना चिस्ती, खासदार कल्याण काळे, खासदार शोभा बच्छाव, प्रदेश काँग्रेसचे खजिनदार अभय छाजेड, उपाध्यक्ष ड. गणेश पाटील,मोहन जोशी, मुजफ्फर हुसेन, महिला काँग्रेस अध्यक्षा संध्या सव्वालाखे, युवक काँग्रेस अध्यक्ष शिवराज मोरे, सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, एनएसयुआय अध्यक्ष सागर साळुंखे, वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे आदी उपस्थित होते.बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना रमेश चेन्नीथला पुढे म्हणाले की, राज्यात नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत सत्ताधारी भाजपा महायुतीने प्रशासकीय यंत्रणेचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर केला. प्रचंड प्रमाणात पैसा वापरला, हा पैसा आला कुठून, असा प्रश्न विचारून सत्ताधारी पक्षाने लोकशाहीची हत्या केली असे चेन्नीथला म्हणाले. विपरित परिस्थितीत काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते दडपशाहीला न भिता निर्धाराने लढले व चांगले यश मिळवले. भाजपा सरकार घोटाळेबाज असून राज्यात गुंतवणूक येत नाही, ती शेजारच्या गुजरात राज्यात जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्याच्या विकासाकडे लक्ष देण्यास वेळ नाही, ते राजकारण करण्यात व अतंर्गत वादातच गुंतले आहेत. चंद्रपूर महापौर निवडणुकीसंदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, चंद्रपूरमध्ये महापौरपदासाठी मविआचा घटक पक्ष उबाठा शिवसेनेने काँग्रेसने पाठिंबा द्यावा यासाठी चर्चा झाली होती पण त्यांनी ऐनवेळी भाजपाला पाठिंबा दिला पण काँग्रेस पक्षाने मात्र भाजपाला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी परभणीत उबाठाला पाठिंबा दिला. चंद्रपूरमध्ये काँग्रेस पक्षात कोणतेही अंतर्गत वाद नाहीत, सर्वांशी चर्चा झाली होती. काँग्रेसने चंद्रपूरचा बदला परभणीत घेतला नाही. लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी मविआ व इंडिया आघाडीची स्थापना झालेली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावर बोलताना रमेश चेन्नीथला म्हणाले की, ही घटना अत्यंत दुःखद आहे. अजित पवार यांच्या कुटुंबातील लोकांनी सीबीआय चौकशीची मागणी केली असेल तर केंद्र सरकारने तशी चौकशी केली पाहिजे, असे रमेश चेन्नीथला म्हणाले.राज्यसभा निवडणुकीसंदर्भात अद्याप काँग्रेस पक्षाशी कोणीही संपर्क साधलेला नाही. जेव्हा तशी विचारणा होईल तेव्हा पक्षश्रेष्ठींशी बोलून निर्णय घेऊ, असेही रमेश चेन्नीथला म्हणाले.

# गरिबांसाठी शाळा चालविणारे महेंद्रशेठ बहुआयामी नेतृत्व-भावना घाणेकर

## गव्हाच्या न्यू इंग्लिश मिडीयम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी रसिकांची मने जिंकली

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

उलवे नोड झपाट्याने विकसित होत आहे. येथे श्रीमंतांसाठी भरपूर शाळा आहेत; परंतु गरिबांसाठी इंग्रजी माध्यमाची शाळा चालविणारे महेंद्रशेठ घरत हे बहुआयामी नेतृत्व आहेत. मी एकेदिवशी सीपी कार्यालयात बसले होते. तेव्हा महेंद्रशेठ मला म्हणाले, 'नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव आहे, भावना तू उभी राहा,' वास्तविक मी या गोष्टीचा विचारही केला नव्हता; परंतु महेंद्रशेठ घरत यांनी माझे नाव पुढे केले, प्रोत्साहन दिले आणि अनमोल सहकार्यही केले. त्यामुळे मी उरणची नगराध्यक्षा झाले. महेंद्रशेठ यांची ख्याती सर्वांना माहिती आहेच, पण माझ्या मागे खंबीरपणे त्यांच्या रूपाने मोठा भाऊ उभा आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे, असे उरणच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा भावनाताई घाणेकर गव्हाण येथे म्हणाल्या. यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेच्या न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल,



शेलघर-गव्हाणचे स्नेहसंमेलन सोमवारी (ता. १६) उत्साहात पार पडले. त्यावेळी त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष महेंद्रशेठ घरत होते. ते म्हणाले, आईच्या नावाने शैक्षणिक संस्था काढली आहे. त्या शाळेत गरिबांची मुले शिकली पाहिजेत, येत्या काळात शाळेची भव्य इमारत उभी राहील, असा मला आशावाद आहे. उरणला भावनाताईंच्या रूपाने डॅशिंग नेतृत्व मिळाले आहे. मी चाणक्या नीतीने त्यांना पुढे केले, परंतु त्या लढल्या आणि जिंकल्या.

यावेळी सोनाली रिॲलिटीचे डायरेक्टर मयुरेश चौधरी, जासई जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, चिरनेर जिल्हा परिषद सदस्य ॲड. अविनाश ठाकूर, गव्हाणच्या पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, पामेचा ग्रुपचे डायरेक्टर कुणाल घरत, मनोज फडकर, ग्रामपंचायतीचे माजी सरपंच वसंत म्हात्रे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

दिव्यांग पालकांच्या मुलांना फीमध्ये महेंद्रशेठ घरत यांनी ५० टक्के सवलत दिली आहे. त्याबद्दल अंध बांधव अशोक कोळी यांनी महेंद्रशेठ घरत यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी १५ गाणी सादर करण्यात आली. त्या गाण्यांच्या तालावर चिमुकल्यांनी नृत्य केले आणि आपल्या कलागुणांनी रसिकांची मने जिंकली. कोळी गीतांना रसिक प्रेक्षकांनी विशेष दाद दिली. यावेळी शाळेचे चेअरमन के. डी. कोळी यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्राचार्या सपना लाड यांनी प्रास्ताविक केले, तर सूत्रसंचालन शितल पारिंगे आणि मयुरी पाटील यांनी केले. शाळेचा सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांनी स्नेहसंमेलनासाठी मेहनत घेतली. त्यामुळे एक वाखाणण्याजोगे स्नेहसंमेलन यशस्वी झाले.

# एसटी बस डेपो उरण येथे संत सेवालाल महाराज यांची २६७ वी जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

संत सेवालाल महाराज हे बंजारा समाजाचे आराध्य दैवत, महान समाज सुधारक आणि अध्यात्मिक गुरु होते.त्यांनी भटक्या बंजारा समाजाला सन्मार्ग दाखवून अंधश्रद्धा अनिष्ट रूढी आणि व्यसनाधीनते विरुद्ध लढा दिला. महाराष्ट्रातील वाशिम जिल्ह्यातील पोहरागड येथे त्यांची समाधी असून ते अहिंसा आणि मानवतेचे प्रणेते मानले जातात.संत सेवालाल महाराज यांनी शिक्षणाचे व स्वच्छतेचे महत्व सर्वांना पटवून देऊन बळीप्रथा (प्राण्याची हत्या) बंद केली. समाजात दारूबंदी केली. भजनाच्या आवडीमुळे त्यांनी बंजारा बोली भाषेत लोकगीते दोहे भजने




रचून उपदेश केला. सत्याने जगणे, प्राण्यावर दया करणे आणि निसर्गाचे रक्षण करणे हे त्यांची शिकवण होती, उपदेश होता आणि त्यांच्या या उपदेशानुसारच समाजाची वाटचाल सुरू असून त्यांनी सांगितलेल्या मार्गावरच समाज चालत असल्याने समाज प्रगती पथावर आहे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष वामनराव राठोड यांनी व्यक्त केले. उरण बस डेपो (आगार) येथे थोर समाज सुधारक संत सेवालाल महाराज यांची २६७ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी वामनराव राठोड यांनी आपले मत व्यक्त करून उपस्थितांना मार्गदर्शन केले.आलेल्या सर्व मान्यवर पाहुण्यांचे त्यांनी स्वागत सत्कार केले.प्रत्येक व्यक्तीने संत सेवालाल महाराज यांच्या उपदेशानुसार वागले पाहिजे, आचरण केले पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले. त्या कार्यक्रम प्रसंगी डी एम बोंद्रे, रोहन खालीपे , खानदेश मित्र मंडळ उरणचे अध्यक्ष प्रकाश चित्ते, कार्याध्यक्ष सुनील चौधरी,संजय पाटील,दिनेश पाटील, गोर बंजारा समाजाचे अबू राठोड, राजेश राठोड,यू. आर.जाधव, विलास चव्हाण, पोलीस कर्मचारी, महिला वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाची रूपरेषा मयूर राठोड यांनी मांडली. अध्यक्ष वामनराव राठोड यांनी सर्वांचे आभार मानले.

# क्षीरसागर विद्यालयाला न्याय; परीक्षा केंद्र पूर्ववत सुरु करण्याचे आदेश


दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

भिगवण येथील कोंडीराम सदाशिव क्षीरसागर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स जुनिअर कॉलेज येथील बारावीचे परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू ठेवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालय यांनी दिले आहेत. त्यामुळे विद्यालय, पालक व विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सविस्तर वृत्त असे की, फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या बारावीच्या परीक्षेदरम्यान या केंद्रावर एका विद्यार्थिनीजवळ भरारी पथकाला कॉपी आढळून आली होती. संबंधित विद्यार्थिनीवर कॉपी प्रकरण नोंदवण्यात आले. त्यानंतर विभागीय शिक्षण मंडळाने संबंधित परीक्षा केंद्र रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.

या निर्णयाविरोधात विद्यालयाने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. युक्तिवादादरम्यान इंदापूर तालुक्यातील दुसऱ्या एका परीक्षा केंद्रावरही तत्सम प्रकार उघडकीस आला



होता, मात्र ते केंद्र पूर्ववत सुरू ठेवण्यात आल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. केवळ एका विद्यार्थिनीच्या गैरप्रकारामुळे संपूर्ण परीक्षा केंद्र रद्द करणे योग्य नसल्याचे मत न्यायालयाने नोंदवले. तसेच परीक्षा कॉपीमुक्त आणि पारदर्शक वातावरणात व्हाव्यात, असे निरीक्षणही न्यायालयाने व्यक्त केले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून क्षीरसागर विद्यालयातील बारावीचे परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू ठेवण्याचे निर्देश दिले. संस्थेच्या वतीने ॲड. लक्ष्मण देशमुख यांनी प्रभावी युक्तिवाद केला.याबाबत संस्थेचे अध्यक्ष अजित क्षीरसागर यांनी सांगितले की, येत्या शैक्षणिक वर्षापासून परीक्षा केंद्र पूर्ववत सुरू होणार आहे. फेब्रुवारी २०२७ मधील बारावीची परीक्षा क्षीरसागर विद्यालयातच होईल. एका विद्यार्थ्याच्या गैरप्रकारामुळे संपूर्ण केंद्र रद्द करणे अन्यायकारक होते. न्यायालयाच्या निर्णयामुळे संस्थेची प्रतिमा अबाधित राहिली असून विद्यार्थ्यांचे नुकसान टळले आहे.

दरम्यान, परीक्षा केंद्र पुन्हा सुरू करण्याच्या निर्णयाचे पालक व विद्यार्थ्यांनी स्वागत केले असून भिगवण परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

# बोर्डाच्या सचिव अनुपमा भंडारे यांच्या हस्ते नेताजी सावंत सन्मानित

दैनिक वादळ वार्ता
**ओसा । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे,आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई,क्रीडा भारती महाराष्ट्र प्रदेश,मॉडर्न व्यायाम शाळा व सांस्कृतिक क्रीडा मंडळ अंबड तालुका अंबड,जिल्हा जालना यांच्या संयुक्त विद्यमाने अंबड येथे आयोजित राज्यस्तरीय सूर्यनमस्कार शिक्षक प्रशिक्षण (ढजढ) व स्पर्धा रथसप्तमी २०२६ निमित्त संपन्न झाल्या.या प्रशिक्षणासाठी व स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून एकूण ४०८ शिक्षकांनी नोंदणी केलेली होती.यामध्ये महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यातून एक योगा/क्रीडा शिक्षकांना राज्यस्तरीय मास्टर ट्रेनिंग देण्यात आली.त्यानंतर सूर्यनमस्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील श्री नेताजी माणिकराव सावंत (सहशिक्षक)श्रीराम माध्यमिक विद्यालय एरंडी सारोळा ता.औसा,जि. लातूर तथा औसा पतंजली योग समिती तालुकाध्यक्ष यांनी उत्कृष्ट सूर्यनमस्कार करून राज्यातील सर्व स्पर्धकावर दणदणीत मात करून लातूर जिल्ह्याला सुवर्णपदक मिळवून दिल्याबद्दल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ लातूरच्या कर्तव्यदक्ष सचिव आदरनिय महोदया अनुपमा भंडारी मॅडम यांनी श्री नेताजी सावंत सरांचा शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन व फेटा बांधून सन्मानित केले.

यापूर्वी आदरनिय भंडारी मॅडम औसा पंचायत समिती येथे गटशिक्षणाधिकारी पदावर कार्यरत असताना श्री नेताजी सावंत यांची आंतरराष्ट्रीय योग दिनाकरिता औसा तालुक्यातील सर्व शिक्षकांना योगाचे प्रशिक्षण देण्यासाठी औसा तालुका समन्वयक (साधनव्यक्ति)म्हणून नियुक्ती केल्या होत्या. तेव्हापासून आजतागायत नेताजी सावंत सर हेच औसा तालुका समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

तसेच तीन जिल्ह्यांच्या कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून अनुपमाजी भंडारी मॅडम यांचाही यथोचित सत्कार हनुमान विद्यालय शिवलीचे माजी मुख्याध्यापक संदिपानजी माळी सरांनी शाल,श्रीफळ देऊन व फेटा बांधून केले.

या सत्कार प्रसंगी,केतन पाटील,प्रा.भगवान शिंदे,प्रा. प्रताप शिंदे.प्रा.शिंदे डी.व्ही.ढमाले साहेब, जमादार साहेब आणि कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.गतवर्षी आणि याही वर्षी सलग दोन वर्षे नेताजी सावंत सरांनी राज्यस्तरीय सुवर्णपदक पटकावलेबद्दल सर्वांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



## जनसुनावणी की कॉर्पोरेटची नाटकबाजी? कॉ.सचिन मोतकुरवार यांचा घणाघाती सवाल

दैनिक वादळ वार्ता
**सिरोंचा । प्रतिनिधी**

मुधोली–जैरामपूर–गणपूर परिसरात प्रस्तावित वरद फेरो अलॉय कंपनीच्या लोह प्रक्रिया प्रकल्पासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पर्यावरणीय जनसुनावणीदरम्यान डाव्या आघाडीच्या अनुभवी कम्युनिस्ट प्रतिनिधींना प्रवेश नाकारण्यात आल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेवर भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. सचिन मोतकुरवार यांनी घणाघाती सवाल उपस्थित करत प्रशासनावर कॉर्पोरेट धार्जिणी भूमिकेचा आरोप केला आहे.प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने जनसुनावणीत सहभागी होण्यासाठी कॉम्रेड भाई रामदास जराते, कॉम्रेड अमोल मारकवार व कॉम्रेड देवराव चवळे हे जिल्हाधिकारी कार्यालयात गेले असता प्रशासनाने त्यांना गेटवरच रोखले. अनेक वर्षे ग्रामसभा बळकट करण्यासाठी, सार्वजनिक निधीच्या पारदर्शक वापरासाठी आणि शेतकरी–आदिवासींच्या हक्कांसाठी लढणाऱ्या या अभ्यासू कम्युनिस्ट प्रतिनिधींनाच जनसुनावणीतून दूर ठेवणे म्हणजे जनतेचा आवाज दडपण्याचा प्रयत्न असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

कॉ. सचिन मोतकुरवार यांनी म्हटले की, जनसुनावणी ही लोकशाही प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. मात्र जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण नसताना आणि ग्रामसभेची स्पष्ट संमती नसताना अशी जनसुनावणी घेणे म्हणजे केवळ औपचारिकता उरकून कॉर्पोरेट घराण्यांना लाभ मिळवून देण्याचा डाव आहे. ही जनसुनावणी की कॉर्पोरेटची नाटकबाजी, असा प्रश्न आज जनतेसमोर उभा आहे.

अनुसूचित क्षेत्रातील जल–जंगल–जमीन हे स्थानिक आदिवासी व शेतकरी जनतेचे हक्काचे संसाधन असून, ते भांडवलशाहीच्या नफेखोर धोरणांसाठी लुटण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामसभेचा निर्णय, स्थानिक जनतेची संमती आणि पर्यावरणीय परिणाम यांचा सखोल विचार न करता पुढे जाणे हे संविधानिक मूल्यांना तिलांजली देणारे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अन्यथा डाव्या आघाडीच्या वतीने जिल्हाभर व्यापक व तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा कॉ. सचिन मोतकुरवार यांनी दिला आहे. जनतेच्या हक्कांच्या रक्षणासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार डाव्या आघाडीने व्यक्त केला आहे.

## स्वप्नपूर्तीसाठी झटत रहावे सी .ए राजेंद्र डांगी यांचे प्रतिपादन

दैनिक वादळ वार्ता
**मुरुम । प्रतिनिधी**

ज्ञान आणि कौशल्याच्या आधारे जीवनात उत्कर्ष साधता येतो.तुम्हाला मिळालेला जन्म सार्थकी लावण्यासाठी मोठी स्वप्ने पहा व स्वप्नपूर्तीसाठी निरंतर झटत रहा, असे प्रतिपादन पुणे येथील सी. ए. राजेंद्र डांगी यांनी केले. ते श्री माधवराव पाटील महाविद्यालय येथे बोलत होते.

महाविद्यालयातील वाणिज्य विभागआयोजित आत्मनिर्भरता आणि वाणिज्य शाखेतील व्यवसायाच्या संधी या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.प्रत्येकाने स्वप्ने पाहिलीपाहिजेत. परंतु,ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आपल्याकडेकिमान कौशल्ये असणे गरजेचे असते.जन्माने सर्व सारखेच असून कर्माने माणूसमोठा होतो. मोठे होण्यासाठी आधुनिक शिक्षण घेत उंबरठा ओलांडावा लागतो.कोणत्याही क्षेत्रात जाण्यापूर्वी त्या क्षेत्रातील संधी, तेथील सुरक्षितता, त्या



क्षेत्राचे भविष्य आदी बाबी तपासल्या पाहिजेत. वाणिज्य शाखेत व्यवसायाच्या अनेक संधी असूनआयुष्य उन्नत करण्यासाठी त्या मिळविल्या पाहिजेत, असेही ते म्हणाले. अध्यक्षस्थानी मार्गदर्शन करताना सी. ए.राजेंद्र डांगी होते.प्रमुख उपस्थितीत वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.रविंद्र गायकवाड हे होते. त्यांनी म्हणाले की, विद्यमान काळात कौशल्याधारित शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. आजचे जग हे झपाट्याने बदलत आहे.जिथे पोट भरणार नसेल तिथे वेळ वाया घालने परवडणारे नसून वाणिज्य शाखेतील नव्या संधी शोधा, आर्थिक हित साधणाऱ्या व्यवसायाकडे वळा, असेही ते म्हणाले.यावेळी वाणिज्य विभागाचे डाॅ. सुधीर पंचगल्ले, रसायनशास्त्र विभागाचे डाॅ.सुजित मटकरी, प्रा.भुषण पाताळे

वाणिज्य विभागाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्याचा परिचय व प्रास्ताविक डाॅ.रविंद्र गायकवाड यांनी करुन दिला तर आभार प्रदर्शन डाॅ.सुधीर पंचगल्ले यांनी मानले.

## जवळगा येथील देवणी जातीची गाय महा पशुधन एक्स्पोमध्ये सर्वप्रथम

दैनिक वादळ वार्ता
**देवणी । प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील जवळगा येथील प्रगतिशील पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांच्या देवणी जातीच्या गायीने प्रथम क्रमांक पटकावत गावाचे नाव पुन्हा एकदा राज्यभर उज्वल केले आहे. परळी वैजनाथ येथे संपन्न झालेल्या महा पशुधन एक्स्पोमध्ये या स्पर्धेत राज्यातील राज्यभरातील नामांकित पशुपालकांनी सहभाग घेतला होता. कडवी चुरस असतानाही धोंडीराम सुर्यवंशी यांच्या देवणी गायीने आपल्या तंदुरुस्ती, सशक्त पायांची रचना आणि दुधाळ क्षमतेमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले.उत्कृष्ट बांधा, संतुलित शरीररचना, उच्च दूध उत्पादन क्षमता आणि शुद्ध वाण वैशिष्ट्यांच्या आधारे परीक्षकांनी या गायीची निवड केली असल्याचे त्यांनी सांगितले.विजेत्यांचा



सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.यापूर्वी पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांच्या गायीने देशपातळीवर दिल्ली,मद्रास,बेंगलोर,सिंधुदुर्ग अशा ठिकाणी सहभाग घेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.त्यांना उत्कुष्ठ गोपालक पशुसंवर्धन विषयक आवड म्हणून तत्कालीन जिल्ह परिषद अध्यक्ष दिलीपराव देशमुख व सभापती अण्णासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला होता. त्यानिमित्ताने जवळगा येथे ग्रामस्थाच्यावतीने पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांचा जेष्ठ नागरिक माजी पंचायत समिती सदस्य वामनराव पाटील यांच्या हस्ते शाल,हार,फेटा बांधून सत्कार करण्यात आला.यावेळी शेतकरी मुरलीधर बोकडे यांनी गायीसाठी शेंगदाणा पेंड दिली.माजी सरपंच ब्रम्हानंद रेड्डी,चेअरमन शेषेराव पाटील,विजयकुमार पाटील,अनिल पाटील,यशवंत सोनकांबळे,यज्ञेश्वर बिरादार,बसवराज स्वामी,राजकुमार मुळे,भागवत मुळजे ,विवेकानंद जाधव,माधव गंभीरे,संगाप्पा कुंभार ,विलास श्रीमंगले,बालाजी गंभीरे,रंगराव सौदागर आदी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिंगाप्पा कुंभार,रामलिंग शिरसे, किशोर सौदागर यांनी प्रयत्न केले.धोंडीराम सुर्यवंशी यांच्या या यशामुळे जवळगा परिसरात आनंदाचे वातावरण असून, देवणी जातीच्या संवर्धनाला नवे बळ मिळाले आहे

## कंधार येथील व्यापारी संकुलास स्व.अजित दादा पवार यांचे नाव



दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

आजचा दिवस कंधार शहरासाठी अत्यंत भावूक आणि अभिमानाचा आहे. आपल्या शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या नवीन व्यापारी संकुलास लोकनेते, सर्वांचे लाडके स्व. अजितदादा पवार यांचे नाव देण्याचा ठराव कंधार नगरपरिषदेत सर्वसंमतीने मंजूर झाला आहे.

दादांचे विचार आणि त्यांची कार्यपद्धती नेहमीच विकासाला दिशा देणारी ठरली. हे व्यापारी संकुल केवळ सिमेंट-काँक्रीटची इमारत नसून, दादांच्या दूरदृष्टीला दिलेली एक छोटीशी श्रद्धांजली आहे. या निर्णयामुळे दादांच्या स्मृती आपल्या शहरात कायम जिवंत राहतील.

आमदार श्री प्रतापरावजी पाटील चिखलीकर.नगराध्यक्ष सर्व नगरसेवक आणि प्रशासनाचे मनापासून आभार, ज्यांनी या प्रस्तावाला पाठबळ दिले. विकासाची ही गंगा अशीच वाहत राहो!

# घरकुल मंजूर पण हप्ता कागदावरच लाभार्थ्यांचा संताप;शासनाकडे थेट सवाल

## घरकुल मंजूर,खात्यामध्ये हप्ता कधी पडणार? गरीबांची थट्टा?

दैनिक वादळ वार्ता
**धर्माबाद । प्रतिनिधी**

धर्माबाद तालुक्यातील लाभार्थ्यांचे घरकुल मंजूर झाले, पहिला हप्ता मिळाला, बांधकाम सुरू केले पण आता पुढचे हप्ते कुठे अडले? असा संतप्त सवाल प्रधानमंत्री आवास, मोदी आवास व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांनी शासनाकडे उपस्थित केला आहे. धर्माबाद पंचायत समिती कार्यालयात लाभार्थ्यांनी थेट धडक देत दुसरा व तिसरा हप्ता कधी मिळणार, असा जाब विचारला असता घरकुल आपरेटर कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येते की डी.य.सी एक्सपायर झाली, असे कारणं देत उत्तर देण्यात आले. पण जेव्हा डी.य.सी. चालू होती. तेव्हाचा गौडबंगाल काय लाभार्थ्यांकडुन असा संताप जनक प्रश्न ? या उत्तरामुळे लाभार्थ्यांच्या संतापात भर पडली आहे.

लाभार्थी म्हणतात, घरकुल यादीत नाव आल्यानंतर स्वप्न साकार होईल, अशी अपेक्षा होती. पहिला हप्ता मिळाल्यानंतर बांधकाम साहित्य खरेदी करून कामाला सुरुवात केली ; मात्र आता निधीअभावी बांधकाम अर्धवट अवस्थेत अडकले आहे. आता न्याय मागण्यासाठी नेमके कुणाकडे जावे? असा प्रश्न गरीब व गरजू लाभार्थ्यांपुढे उभा राहिला आहे.

ग्रामीण व गरीब कुटुंबांना हक्काचे पक्के घर मिळावे, या उद्देशाने शासनाने प्रधानमंत्री आवास, मोदी आवास व रमाई घरकुल योजना राबवल्या; मात्र प्रत्यक्षात अनुदान वेळेवर न मिळाल्याने या योजना लाभार्थ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. एकीकडे 'घरकुल'ची घोषणा, तर दुसरीकडे कर्मचारी कडुन' डी.य.सी. वेळेवर लावत नसल्यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये हप्ता जमा होत नसल्यामुळे लाभार्थ्यांकडून संताप व्यक्त होत आहे. लाभार्थ्यांना घरकुल हप्ता पासून प्रतीक्षेत ठेवले जात असल्याचा आरोप लाभार्थ्यांकडुन होत आहे.

बांधकाम साहित्याचे वाढते दर, गजाळी व रेतीचे गगनाला भिडलेले भाव यामुळे घर बांधणे आधीच कठीण झाले आहे. पूर्वी सहाशे रुपयांत मिळणारी रेती आता स्वप्नवत झाली असून, वाढती महागाई गरीबांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. शासनाकडून मिळणारे एक लाख ४८ हजार रुपयांचे तुटपुंजे अनुदान सध्याच्या दरांमध्ये अपुरे ठरत असल्याने लाभार्थी स्वतःच्या खिशातून पैसे टाकून घराचे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहेत.पहिला हप्ता मिळाला, काम सुरू केले; पण दुसरा व तिसरा हप्ता अद्याप जमा न झाल्याने अनेक ठिकाणी बांधकामे अर्धवट सोडावी लागली आहेत, असे लाभार्थी सांगतात. यामुळे घरकुलाच्या नावाखाली गरीबांची थट्टा होत आहे, अशी तीव्र भावना व्यक्त केली जात आहे.

धर्माबाद तालुक्यातील प्रधानमंत्री आवास, मोदी आवास व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांनी शासनाकडे तात्काळ दुसरा व तिसरा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

घर बांधण्यासाठी आम्ही सज्ज आहोत; आता शासनाने निधी टाकून सज्ज व्हावे, अशी थेट मागणी लाभार्थ्यांनी केली आहे.

# केज नगरपंचायत भ्रष्टाचाराने हादरली! २.६२ कोटींचा ‘घरकुल’ घोटाळा: बड्या माशांची नावे उघड होणार?

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायत अंतर्गत पंतप्रधानआवास योजनेत (झच-ध) झालेल्या कोट्यवधींच्या घरकुल घोटाळ्याने जिल्हाभरात खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी नेमलेल्या चौकशी समितीला बँके कडून महत्त्वाचे पुरावे हाती लागले असून, यामध्ये धनादेशावर स्वाक्षऱ्या करणाऱ्या आणि अनुदान लाटणाऱ्या बड्या माशांची मोठी यादी समोर आली आहे.

घोटाळ्याचे स्वरूप: गरिबांच्या हक्काच्या पैशावर डल्ला नगर पंचायत प्रशासनाने घरकुल अनुदानाचे तब्बल २ कोटी ६२ लाख रुपये लाभार्थींच्या खात्यात जमा करण्या ऐवजी,महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या माध्यमातून विविध ट्रेडर्स,फॅब्रिकेटर्स आणि इलेक्ट्रिकल्स अशांना १५८ धनादेशा द्वारे सुमारे ६० जणांना वाटले आहेत.

नियमबाह्य उधळण: घरकुल अनुदान इतर कामांसाठी वापरणे हाच मुळात मोठा गुन्हा आहे.

**कागदपत्रांचा अभाव**

ज्यांच्या नावे धनादेश काढले गेले,त्यांनी कोणते काम केले? त्यांचे वर्क ऑर्डर (कार्यारंभ आदेश) किंवा देयके (इळश्रश्री) कोठे आहेत? याचे कोणतेही रेकॉर्ड केज नगरपंचायतीकडे उपलब्ध नाही.

**पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न**

प्रकरणाशी संबंधित अनेक महत्त्वाच्या संचिका (ऋळश्रशी) केज नगरपंचायत मधून गायब करण्यात आल्या असून, हा पुरावे नष्ट करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.तपास समितीच्या हाती बँक स्टेटमेंट’चा मोठापुरावा अंबाजोगाई चे उपजिल्हाधिकारी दीपक वंजाळे यांच्या नेतृत्वाखालील समितीने तपासाचा चक्रावून टाकणारा अहवाल तयार केला आहे.समितीला १५८ पैकी बहुतांश धनादेशांची माहिती मिळाली आहे.यातील उर्वरित १८ धनादेश इतर बँक शाखांतून वटवण्यात आल्याने त्यांची माहिती पुढील दोन दिवसांत मिळणार आहे.यामध्ये प्रशासनातील बडे अधिकारी,कर्मचारी आणि काही




’अर्थमूव्हर्स’ची साखळी असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**आ. मुंदडा आक्रमक,फौजदारी गुन्हे दाखल करा!**

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत आमदार नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री आणि विभागीय आयुक्तांना लेखी पत्र पाठवले आहे.त्यांच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे आहेत:तात्काळ कारवाई: घोटाळ्यातील दोषी अधिकारी,कर्मचारी आणि पुढाऱ्यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

**रक्कम वसुली**

गैरव्यवहार झालेली संपूर्ण रक्कम वसूल करून २०१८-१९ मधील पात्र लाभार्थ्यांना परत मिळावी.

**व्याजासह भरपाई:**

गरिबांच्या हक्काचे २.५ ते ३ लाख रुपये त्यांना व्याजासह देण्यात यावेत. ज्यांनी गरिबांच्या घराचे स्वप्न चोरले आहे,त्यांना सोडले जाणार नाही. संचिका गायब करणे हा गुन्हा लपवण्याचा प्रकार आहे,परंतु बँकिंगव्यवहार खोटे बोलत नाहीत.आता सर्वांच्या नजरा जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाकडे चौकशी समितीचा पूर्ण अहवाल सादर झाल्यानंतर या प्रकरणातील ’बडे मासे’ गळाला लागण्याची शक्यता आहे. प्रशासकीय अधिकारी आणि कंत्राटदारांचे धाबे दणाणले असून केजच्या राजकारणात आणि प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

## कृषी प्रदर्शन व पशुसंवर्धन मेळावे घेऊन शेतकऱ्याचे भले होणार नाही,नुकसान भरपाई संदर्भात तात्काळ नवीन कायदा करून अंमल बजावणी करा-वसंत मुंडे

दैनिक वादळ वार्ता
**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील त्रिमूर्ती सरकारने शेतकऱ्यासाठी शेती माला संदर्भात किमान आधारभूत किंमत,पिक विमा व बोगस खते,बी - बियाणे कीटकनाशके औषधे संदर्भात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची कायद्यात तरतूद करून तात्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शासना कडे केली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना असल्या तरी प्रत्यक्षात अंमल बजावणी करणारे लोक प्रतिनिधी संबंधित खात्याचे कर्मचारी व अधिकारी,मंत्री कार्यालयात टक्केवारी घेतल्या



शिवाय कामांना मंजुरी मिळत नाही असा गंभीर आरोप काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी केला पशुसंवर्धन व कृषी प्रदर्शन मेळावे राज्यात विविध ठिकाणी चालू आहेत परंतु जनतेच्या टॅक्स मधून जो पैसा शासनाला मिळतो त्याचा दुरुपयोग प्रदर्शने,मेळावे व बोगस योजना दाखवून संबंधित प्रशासकीय अधिकारी लोकप्रतिनिधी मंत्री कार्यालयात टक्केवारी घेऊन पैसे हडप करतात त्यातून जनतेच्या हिताच्या योजनाची अंमल बजावणी नियमानुसार होत नाही.शेतीमध्ये नवे तंत्रज्ञान नवीन खते बी बियाणे औषधी कीटकनाशके,आधुनिक शेती अवजारे,शेतीशी निगडीत नवीन प्रयोग व पशुसंवर्धना संदर्भात नवीन सरकारच्या योजनाची माहिती जनतेपर्यंत प्रसार माध्यमाद्वारे व विविध विभागामार्फत प्रत्यक्षात दिली पाहिजे परंतु जनतेचे पैसे खर्च करण्या करता हे मेळाव्याचे आयोजन केले जाते असा गंभीर आरोप काँग्रेस नेते वसंत मुंडे यांनी केला आहे.

## निरोप समारंभ माऊली विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना जड अंत:करणाने निरोप

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

जवळबन येथील माऊली विद्यालय जवळबन ता. केज येथील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ नुकताच अत्यंत उत्साहात आणि भावूक वातावरणात पार पडला.शालेय जीवनाचा एक टप्पा पूर्ण करून भविष्यातील स्वप्न साकारण्यासाठी सज्ज झालेल्या या विद्यार्थ्यांना मान्यवरांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.मान्यवरांची उपस्थितीयाक ार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानीविद्यालयाचे सेवानिवृत्त माजी मुख्याध्यापक श्री.गदळे जी.बी.होते.प्रमुखअतिथी म्हणून जवळबन गावचे सरपंच श्री.राजेभाऊ करपे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. बालासाहेब भाकरे बप्पा, सेवानिवृत्त माजी मुख्याध्यापक श्री.माने ए.एन आणि जवळबन ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक श्री.मोरे साहेब यांची उपस्थिती होती.



मार्गदर्शन आणि शुभेच्छा कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. गदळे सरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर तुम्ही आयुष्या तील कोणतीही परीक्षा यशस्वीपणे पार करू शकता.दहावीची परीक्षा ही तुमच्या करिअरची पहिली पायरी आहे. तसेच सरपंच श्री. राजेभाऊ करपे आणि बालासाहेब भाकरे यांनीही विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेसाठी शुभेच्छा देत उज्वल भविष्यासाठी प्रोत्साहित केले.शिक्षकांचे परिश्रम हा निरोप समारंभ यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी वृंदाने विशेष परिश्रम घेतले.यामध्ये श्री.हजारे एस.बी,श्री. सोळंके एस.डी,श्री. देशमुख आर.आर, श्री.निकम ए.एम, श्री.पवार एल.एफ यांच्या नियोजनामुळे कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शाळेतील आठवणींना उजाळा दिला.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी ’हॉल तिकीट’ आणि शुभेच्छा देऊन निरोप दिला.

## केज तालुका लिपिक वर्गीय कर्मचारी कार्यकारणी जाहीर



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासकीय,निम शासकीय अधिकारी व कर्मचारी संघटना यांची केज तालुकाकार्यकारणी नुकतीन जाहीर झाली असून श्रीमती शेप एस. एस.सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती केज यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या सभेमध्ये केज तालुका लिपिक वर्गीय कर्मचारी कार्यकारिणीची निवड करण्यात आली आहे. यामध्ये तालुकाध्यक्ष श्री दत्तात्रय ढाकणे व तालुका उपाध्यक्ष रामराव पवार तसेच सचिव रासवे ज्ञानेश्वर व कोषाध्यक्ष शेख आर.के. आणि तालुका संघटक नानजकर एस.एस. तालुका महिला सचिव श्रीमती बनकर एस.डी तालुकासल्लागार श्रीमती शेप एस.एस.व ढोकर एम.एस तालुका संपर्क प्रमुख बेंदरे सचिन, तालुका प्रसिद्धी प्रमुख मासुमदार एस.बी.वरील प्रमाणे सर्वानुमते केज तालुका कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

## महात्मा फुले यांच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी केज मध्ये निषेध व्यक्त करून महात्मा फुले युवा दलाच्या वतीने अमित शहा यांना निवेदन दोषींवर कठोर कारवाई ची केली मागणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील तेल्हापूर येथे महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याची विटंबना झाल्याच्या निषेधार्थ महात्मा फुले युवा दलाच्या वतीने तहसीलदाराच्या मार्फत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना निवेदन देऊन दोषीवर कठोर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली ७ फेब्रुवारी २०२६ रोजी समाजकंटकाने हे निंदनीय कृती केले ज्या महामानवाने शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली स्त्री पुरुष समानता आणि सत्यशोधक विचाराचा प्रसार केला त्यांचा पुतळा पाडून त्यांचे विचार नष्ट होऊ शकत नाहीत असा संताप व्यक्त करण्यात आला या घटनेमुळे शिव - शाहू - फुले आंबेडकर यांच्या महाराष्ट्रात तीव्र पडसाद




उमटले आहेत तेलंगणा सरकारने या प्रकरणात लक्ष घालून दोषीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्राचे मुख्य मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सुद्धा निवेदन पाठवून दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे यावेळी महात्मा फुले युवा दल केज तालुका प्रमुख विश्वास राऊत तसेच धनराज लाटे,सरपंचपती नंदूलाल मिसाळ,संतोष सत्वधर, रामेश्वर राऊत,दादासाहेब बिक्कड,सचिन राऊत, पत्रकार विजय बिक्कड, पांडुरंग कसबे यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रद्धेचा महाकुंभ! आई देवमोगरा यात्रेसाठी भाविकांचा जनसागर; बोरद-तळोदा मार्गावर भक्तीचे चैतन्य

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

गुजरात राज्यातील आदिवासी समाजाचे परम श्रद्धास्थान आणि कुलदैवत असलेल्या आई देवमोगरा मातेच्या यात्रेला १५ फेब्रुवारीपासून मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. महाशिवरात्रीचे औचित्य साधून या ठिकाणी दर्शनासाठी महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश, गुजरात राज्यातील कानाकोपऱ्यातून भाविक दाखल होत आहेत. सध्या फेब्रुवारीचा मध्यम टप्पा सुरू असताना उन्हाची तीव्रता वाढत आहे, तरीही भाविकांच्या उत्साहात तसूभरही कमतरता दिसून येत नाही.

**पांढरी शुभ्र ’मानतेची टोपली’ आणि पायी दिंडी:**-बोरद ते तळोदा या मुख्य रस्त्यावर सध्या पायदळ जाणाऱ्या भाविकांच्या रांगा पाहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे, अनेक भाविक आपली ’मानता’ (नवस) फेडण्यासाठी पायी प्रवास करत आहेत. डोक्यावर पूजेचे साहित्य, मोहफुलाचा अर्क आणि नैवेद्यासाठी लागणारे इतर साहित्य असलेली टोपली, जिला पांढऱ्या शुभ्र कापडाने घट्ट बांधलेले असते, अशी ही शिस्तबद्ध दिंडी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

**ट्रॅक्टर सफारीची पारंपरिक ओढ:**-या यात्रेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पूर्वापार चालत आलेली ट्रॅक्टरची परंपरा. आधुनिक वाहने उपलब्ध असूनही, आजही भाविक ट्रॅक्टरला फुलांनी सजवून, ट्रॉलीवर उन्हापासून संरक्षणासाठी लाकडी दांडक्यांच्या साहाय्याने तात्पुरते छत (छप्पर) तयार करून सहकुटुंब प्रवास



करत आहेत. मोठ्या आवाजात वाजणारी देवमोगरा मातेची गाणी आणि ट्रॅक्टरचा ताफा यामुळे परिसरात एक वेगळेच भक्तीमय चैतन्य निर्माण झाले आहे. वाढत्या उन्हामुळे पायी जाणाऱ्या भाविकांचे हाल होऊ नयेत, यासाठी सामाजिक भान जपले जात आहे. बोरद परिसरातील सेवाभावी संस्था आणि गावकऱ्यांच्या वतीने ठिकठिकाणी: थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांच्या विश्रांतीसाठी सावलीची सोय करण्यात आली आहे. तळोद्यापासून अवघ्या दोन किमी अंतरावर असलेल्या आमलाड या गावी देखील मातेचे जुने मंदिर आहे. या ठिकाणीही सध्या छोटी यात्रा भरली असून, जे भाविक मुख्य ठिकाणी जात आहेत, ते आवर्जून आमलाड येथे थांबून दर्शन घेत आहेत.

**प्रशासनाचे आवाहन**-रस्त्यावरील वाहनांची वाढती संख्या आणि भाविकांची गर्दी लक्षात घेता, वाहनचालकांनी बोरद-तळोदा मार्गावर सावधगिरीने वाहने चालवावीत आणि पायी चालणाऱ्या भाविकांना सहकार्य करावे, असे आवाहन स्थानिक प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## मा.अंजली शर्मा (आय.ए.एस.) यांची एमआयडीसी भालेर येथे क्षेत्रीय पाहणी



दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. उपविभागीय अधिकारी अंजली शर्मा यांनी भालेर येथील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रास भेट देऊन विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला.

या पाहणीदरम्यान औद्योगिक क्षेत्रातील उपलब्ध सुविधा, प्रलंबित कामे, पायाभूत सुविधा तसेच उद्योगधंद्यांची सद्यस्थिती यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.रस्ते, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, ड्रेनेज व्यवस्था तसेच इतर मूलभूत सुविधांची तपासणी करण्यात आली. काही ठिकाणी सुधारणा आवश्यक असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित विभागांना तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.औद्योगिक क्षेत्राचा सर्वांगीण विकास, गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करणे आणि स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती वाढविणे या उद्देशाने ही पाहणी महत्त्वपूर्ण ठरली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077